

ग्राहक जपणारी माणसं...




परचुरेंचं पोळीपुराण

# अमृतवेल बिझनेस

May 2015 / ₹ : 60/-

www.amrutwelmedia.com




JAIN®
Jain Irrigation Systems Ltd.
*Small Ideas. Big Revolutions.®*


जैन उद्योग समूहाचे

## मेक फॉर इंडिया

पद्मश्री भवरलाल जैन,
संस्थापक, जैन एरिगेशन आणि उद्योग समूह

कव्हर Story

# जैन एरिगेशनचे मेक फॉर इंडिया

सर्वसामान्यांनाही पिण्याचे शुद्ध पाणी सहज व सुलभरीत्या उपलब्ध व्हावे, या ध्येयाने जैन इरिगेशनमार्फत तीन वर्षांपासून सुरू असलेल्या प्रयत्नांना यश मिळालं आहे. अथक संशोधनानंतर विकसित करण्यात आलेल्या 'जैन सोलर वॉटर फिल्टर' या उपकरणाला जागतिक स्तरावरचा प्रथम क्रमांकाचा 'डेसल' पुरस्कार मिळाला आहे. भारताला 'मेक इन इंडिया'च्या दिशेने घेऊन जाण्याचा प्रयत्न केंद्र सरकारने चालवला आहे; परंतु जैन उद्योग समूह गेली ४०-४५ वर्षे याच दिशेने संयमाने वाटचाल करत आहे. त्याच वाटचालीतलं 'जैन सोलर वॉटर फिल्टर' हे आणखी एक पुढचं पाऊल. विशेष म्हणजे ही वाटचाल करताना आपण जे काही करू ते 'फॉर इंडिया' असेल याचं भानही जपलेलं आहे. जैन इरिगेशनची सौर ऊर्जा क्षेत्रातली ही घोडदौड्ही 'मेक इन इंडिया, फॉर इंडिया' अशीच आहे. त्याविषयी...

धर्मेंद्र पवार
editor@amrutwelmedia.com

विलास पाटील
aksharsamwad@gmail.com



मोठी स्वप्न पहात उच्च ध्येयानं झपाटल्यागत काम केलं, तर कोणताही माणूस शून्यातून आपलं स्वतंत्र विश्व निर्माण करू शकतो. त्याला समाजाच्या, सर्वसामान्य कष्टकरी वर्गाच्या भल्याची जोड दिली, तर असा माणूस आपल्या कामातून आपल्या देशाचं नावं जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवू शकतो. त्यातून तो अख्ख्या विश्वाचा बनतो. विश्वात देशाचं नेतृत्व करतो. कारण तो देशासाठी काम करत असतो. त्यामुळे कितीही उड्डाणे मारली तरी तो जमिनीवर घट्ट पाय रोवून उभा असतो. जैन एरिगेशन आणि उद्योग समूहाचे संस्थापक, पद्मश्री भवरलाल जैन अर्थात मोठे भाऊ यांनी हे आपल्या कृतीतून दाखवून दिलं आहे. म्हणूनच खान्देशी मातीत जन्मलेला जळगावचा जैन उद्योग समूह आता जळगावचा राहिलेला नाही, तो महाराष्ट्राचाही राहिलेला नाही. भारत देशाचे नाव त्रिखंडात दुमदुमविल्यामुळे तो आता अभिमानाने या देशाचेच प्रतिनिधित्व जगभर करत आहे.

डिझेल, रॉकेलची फुटकळ विक्री, बी-बियाणं, जंतूनाशकं यांचं दुकान ही झाली ४०-४५ वर्षांपूर्वीची ओळख. अर्थात, इथेच झाली होती जमिनीच्या बांधिलकीची सुरुवात, जी उपजत होती. म्हणूनच व्यापाराच्या जोडीला शेती होती-तेव्हाही आणि आताही; पण शेती आंधळेपणानं कधी केली नाही. जमीन कसणाऱ्याला तिनं भरभरून द्यावं, कायम देत राहावं म्हणून नव्या प्रगत तंत्रज्ञानाची कास धरली. त्यातूनच आज काळाचं भान ठेवून, अतिप्रगत तंत्रज्ञान या शेतीत कुणी राबवावं, असा प्रश्न उपस्थित झाला तर जैन उद्योग समूहाचं नाव प्रथम पुढे येतं. याचं कारण उपजतची बांधिलकी.

बांधिलकी माणसाला सतत जागृत ठेवते. यातूनच पावलोपावली येणारा अनुभव तुम्हाला नव्यानं काही शिकवतो, समृद्ध बनवतो. असा समृद्ध करणारा इथल्या शेतीतला पिढ्यान्‌पिढ्यांचा अनुभव भाऊंच्या पाठीशी होता, ही एक बाजू झाली; परंतु त्या पुढे जाऊन भवरलाल जैन यांनी पाश्चिमात्य देशात विकसित झालेलं अतिप्रगत





''येत्या दोन-तीन वर्षांत सोलर वॉटर फिल्टर तंत्रज्ञानामुळे एटीएम मशीनप्रमाणेच शुद्ध पाण्याची डब्ल्यूटीएम मशीन्स जागोजागी बसलेली पाहायला मिळू शकतील. लोकांनी त्यात एक रुपयाचं नाणं टाकावं आणि एक लिटर शुद्ध पाणी घ्यावं, असंही या संशोधनामुळे शक्य होईल.''

**पद्मश्री भवरलाल जैन**, संस्थापक, जैन एरिगेशन आणि उद्योग समूह

## जैन उद्योग समूहाची अभिमानास्पद यशाची कमान

- जैन समूहाची वार्षिक उलाढाल सुमारे ७ हजार कोटींवर
- २५ उत्पादन प्रकल्पांतून ५ खंडांमध्ये विस्तार
- जगभरातील ११६ देशांमध्ये ७ हजार विक्रेत्यांचे जाळे
- पीव्हीसी व एचडीपीई पाईप उत्पादनातील सर्वांत मोठी कंपनी
- पाईप, ठिबक सिंचन क्षेत्रात जगातली एक नंबरची कंपनी
- आंबा प्रक्रियेच्या क्षेत्रातही जगात पहिला क्रमांक
- टिश्युकल्चर केळी रोपांच्या उत्पादनातही पहिला क्रमांक
- कांदा आणि भाजीपाला निर्जलीकरणाच्या क्षेत्रात जगात तिसरा क्रमांक
- मायक्रो इरिगेशनच्या क्षेत्रात जगामध्ये पहिलं स्थान
- जगभरात उत्पादन विक्री आणि विक्रीपश्चात सेवा
- सुमारे १० हजारांहून अधिक लोकांना कायमस्वरूपी रोजगार

तंत्रज्ञान इथल्या मातीत, माणसांत रुजवण्याची जिद्द बाळगली. ते भारतीय शेतीच्या गरजेनुसार रुजवलं, वाढवलं. त्यासाठी लागणारी महत्त्वाकांक्षा, तळमळ, ध्यास होताच. इतकंच नाही, तर यासाठी स्वयंधारित जबाबदारीची जाणीव हवी. ती होती आणि आजही आहे. ही जैन उद्योग समूहाची दुसरी बळकट बाजू. याच जाणिवेने सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक उन्नती, स्थैर्य घडवून आणणारे प्रकल्प राबवण्याची प्रेरणा जैन उद्योग समूहाला मिळाली असणार. त्याशिवाय का पीव्हीसी पाईप्स, एचडीपीई-केसिंग पाईप्स, ठिबक सिंचन, स्प्रिंकलर्स, ऊतीसंवर्धित रोपं, विद्राव्य खतं, हरितगृह, भाजीपाला-फळे प्रक्रिया, सौर ऊर्जेचा शेतीमध्ये वापर या रूपानं नवनवे उद्योग उभा राहिले!

या उद्योग समूहाच्या मुळाशी सर्वसामान्य शेतकरी, त्याची शेती आणि कृषिप्रधान देशाचं भवितव्य उज्ज्वल कसं होईल, हा विचार आहे. म्हणूनच हा उद्योग समूह निसर्ग संरक्षण, ऊर्जा संवर्धन, पर्यावरण शुद्धिकरण अशी व्यापक दिशा घेत पुढे आला. सौरऊर्जेचा वापर करत पाणी तापवण्यापासून ते सौर कृषि पंपापर्यंतचे प्रकल्प याच नैसर्गिक बांधिलकीतून त्यांनी पुढे आणले. त्यातून गुणवंत, नामवंत उत्पादनांच्या मालिकेत वसुंधरासंमत उपकरणं विकसित केली जात आहेत, जी सर्वसमान्यांच्या जीवनाला नवा अर्थ मिळवून देणारी ठरली.


### सर्वसामान्यांना शुद्ध व स्वस्त पाणी देण्याचा ध्यास

सर्वसामान्यांना पिण्यासाठी शुद्ध पाणी हे आजही आवाहनच आहे. यासाठी एक पाऊल पुढे टाकत याच जैन उद्योग समूहाने सौरऊर्जेवर चालणाऱ्या जलशुद्धिकरण उपकरणाची निर्मिती करण्यात जागतिक स्तरावरचं यश संपादन केलं आहे. हे उपकरण प्रत्यक्ष वापरात यायला आणखी काही अवधी लागणार असला तरी सर्वसामान्य लोकांना कमीत-कमी किमतीत शुद्ध स्वरूपातलं पाणी पिण्यासाठी मिळावं हा ध्यास त्यामागे आहे. तेच विषद करताना भवरलाल जैन सांगतात, ''ज्या ज्यावेळी बाहेर शुद्ध पाणी बाटलीद्वारे घ्यावं लागतं त्या त्यावेळी एका गोष्टीचं शल्य माझ्या मनाला टोचत राहातं. ते म्हणजे १२-१५ रुपये लिटर या दराने जे पाणी आपण बाटलीद्वारे घेतो, ते सामान्य कष्टकरी वर्गाला कसं परवडणार. मग त्यांनी शुद्ध पाणी मिळवण्यापासून कायम वंचित राहायचं का? त्यातूनच ग्रामीण भागात सर्वसामान्य माणसाच्या खिशाला परवडेल, असं पिण्याचं शुद्ध पाणी देता येईल का, हा प्रश्न मला नेहमी सतावायचा. या दृष्टीने मी अनेक जलशुद्धी प्रकल्पांचा, तंत्राचा अभ्यास गेली काही वर्षे सातत्याने केला. तथापि, परवडेल अशा किमतीत जास्तीत जास्त शुद्ध पाणी द्यायचं झालं, तर त्याची किंमत प्रतिलिटर एक रुपयापेक्षा कमी होताना आढळून आली नाही. याबाबतीत जागतिक पातळीवर काम करणाऱ्या संस्थांशी संपर्क साधला. यात आमच्याबरोबर संशोधनात भागिदारी करण्यासाठी अनेक संस्थांनी उत्सुकता दाखविली. आमचे कार्य सुरूच होते. करोडो रुपये संशोधनासाठी लावले. सलग तीन वर्षे अथक प्रयत्न केला. त्याला यश मिळालं आणि सौरऊर्जेवर चालणारा 'जैन वॉटर फिल्टर' जन्माला आला. याद्वारे अपारंपरिक ऊर्जेच्या माध्यमातून पाणी शुद्ध करता येतं आणि शुद्ध झालेलं पाणी परवडेल, अशा दरात सर्वसामान्यांना पुरवलं जाऊ शकतं. या तंत्रज्ञानाला 'डेसल प्राइज'मुळे जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे. त्यामुळे आणखी जोमाने काम करण्याचं प्रोत्साहन आम्हाला मिळालं आहे. जोखमीने काम करण्याचा उत्साह वाढला आहे. अर्थात हा पहिलाच टप्पा आहे. यापुढे असे प्रकल्प व्यावसायिक तत्त्वावर प्रत्येक ग्रामपंचायतीत सुरू

# 'मोअर क्रॉप पर ड्रॉप'ला सोलर तंत्राची जोड

*जैन इरिगेशन सिस्टम्सने ठिबक सिंचनाचं तंत्र विकसित करून शेती क्षेत्रात एक वेगळी क्रांती घडवून आणली आहे. उसापाठोपाठ भातासारखं गुडघाभर पाण्यात घेतलं जाणारं पीकही आता ठिबक तंत्राच्या साहाय्याने कमी पाण्यावर कुठंही घेतलं जाऊ शकतं, एवढी मजल जैन इरिगेशनने मारली आहे. अशा पार्श्वभूमीवर केवळ विजेअभावी शेतकऱ्यांना आपले ठिबक सिंचन संच बंद ठेवावे लागत आहेत. त्यावर उपाय म्हणून जैन उद्योग समूहाने सौरऊर्जेवर चालणारे कृषिपंप विकसित केले आहेत. दोन-तीन वर्षांतच देशभरात सुमारे १० हजार जैन सौर पंप बसवले गेले आहेत. याबाबत कंपनीचे उपाध्यक्ष अशोक जैन सांगतात, ''हँड पंप आणि कृषिपंप असे सौर पंपाचे दोन प्रकार आम्ही विकसित केलेले आहेत. यातल्या आमच्या कामाचं महत्त्वाचं वैशिष्ट्य असं, की आम्ही सौर पंपाचा प्रती एचपी खर्च पाच लाखांवरून १ लाख ६५ हजारापर्यंत खाली आणला आहे. ही रक्कमही वीस वर्षांतून एकदाच गुंतवायची आहे. त्यानंतर केवळ देखभाल दुरुस्तीच्या किरकोळ खर्चावर हा सौर पंप पुढची वीस वर्षे विना वीज चालू शकतो. सूर्याची उष्णता हे त्याचं इंधन असल्यामुळे तो दिवसभर केव्हाही चालवता येतो. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची त्याला पसंती मिळत आहे.'' शेतकऱ्यांच्या या पसंतीमुळेच जैन इरिगेशनने देशात सर्वाधिक काम राजस्थानसारख्या राज्यात केलं आहे. राजस्थानमध्ये ५ हजार ५०० सौर पंप कंपनीने बसवले आहेत.*





*त्यामुळे राजस्थानमधल्या एकूण सौर पंपात जैन इरिगेशनचा वाटा ५० टक्के इतका आहे. उर्वरित ५० टक्क्यांमध्ये इतर आठ ते दहा कंपन्या आहेत. याशिवाय कंपनीने कर्नाटक, महाराष्ट्र, बिहार व झारखंड यासह छत्तीसगड, हरियाणा, गुजरात, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, त्रिपुरा, पश्चिम बंगाल या राज्यांमध्येही मोठ्या संख्येने सौर पंप बसवले आहेत. एकूण देशाचा विचार करता महाराष्ट्र मात्र यात बराच मागे दिसतो आहे. याबद्दल बोलताना अशोक जैन म्हणाले, 'पेयजलासाठी हातपंपावर सौरपंप बसवण्यामध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. हातपंपावर हापसून पाणी भरावं लागतं. तो त्रास कमी व्हावा आणि पूर्ण वेळ लोकांना पाणी मिळावं, यासाठी हातपंपांवर सौर पंप बसवण्याची योजना राज्य शासनाकडून राबवली जात आहे. असे २१२५ सौर पंप आम्ही राज्यात बसवले आहेत. त्याशिवाय मध्य प्रदेश-५८०, छत्तीसगड-४९०, झारखंड-१६८, ओरिसा-१८५, पश्चिम बंगाल-९३, आंध्र प्रदेश -५६ आणि उत्तर प्रदेश -६३ या राज्यांमध्येही जैन सौर पंप बसले आहेत. त्यामुळे शेकडो वाड्या-वस्त्यांवर पिण्याच्या पाण्याची चांगली सोय उपलब्ध झाली आहे. अर्थात महाराष्ट्रात हे काम अधिक गतीने पुढे जाऊ शकतं; मात्र योजनेच्या अंमलबजावणीत शासनाने पूर्ण लक्ष देणं गरजेचं आहे.''*

करण्यासाठी अजून कालावधी लागणार आहे.''

शुद्ध पाण्याचं आजच्या काळातलं महत्त्व लक्षात घेतलं तर जैन उद्योग समूहाच्या संशोधन प्रकल्पाचं महत्त्व आपल्या लक्षात येईल. आज माणसाचं जीवनमान उंचावलेलं असलं तरी तितक्याच प्रमाणात आरोग्याचे प्रश्नही निर्माण झाले आहेत. त्यात पाण्यामुळे जवळपास ६० ते ७० टक्के आजार हे उद्भवतात. देशातील संपूर्ण लोकसंख्येला शुद्ध स्वरूपात पाण्याचा पुरवठा केला तर आजाराचं प्रमाण एकदम खाली येऊ शकतं. त्यामुळे आजार झाल्यानंतर त्यावर उपाययोजना करण्यासाठी आपली शक्ती व धन वाया घालवायचे का आजार होऊच नयेत म्हणून शुद्ध पाणीपुरवठा करण्यावर भर द्यायचा, हे ठरवण्याची वेळ आली आहे.

अशा महत्त्वाच्या टप्प्यावर जैन उद्योग समूहाचं हे संशोधन पुढे यावं, ही खूप मोलाची आणि महत्त्वाची गोष्ट आहे. किंबहुना ती मोदी सरकारच्या 'मेक इन इंडिया'चं तत्त्व समर्थपणे पुढे घेऊन जाणारी आहे. त्यापुढे जाऊन ती भारतासाठी गरजेची बाब आहे. त्यादृष्टीने या संशोधनाचं महत्त्व अधिक वाढतं.

### 'रिसर्च-डेव्हलपमेंट-चॅरिटी' ही त्रिसूत्री अंगीकारली

खरं तर जैन उद्योग समूहासारख्या काही संस्था गेली काही वर्षे सातत्याने या देशासाठी मूलभूत, शाश्वत स्वरूपाचं काम मोठ्या जबाबदारीने आणि सामाजिक जाणिवेतून करत आहेत. म्हणूनच आजवरचा भारत घडला आहे, भारतीय समाज घडला आहे. या घडणीत शासनाचा वाटा आहेच. तो असलाच पाहिजे; परंतु



**सोलार फोटो व्होल्टीक संशोधन प्रकल्प, जैन एरिगेशन जळगाव.**

संशोधनाच्या पातळीवरचं जे काम शासनाच्या स्तरावर होणं अपेक्षित आहे ते काम आजवर फारसं झालेलं दिसत नाही. त्यामुळेच प्रगत देशांच्या तुलनेत भारत मागे पडलेला दिसतो. त्याला पुढे आणण्याचं काम जैन उद्योग समूहासारख्या संस्था करताना दिसतात.

''आमची आर्थिक स्थिती कितीही दोलायमान झाली तरी आम्ही रिसर्च-डेव्हलपमेंट आणि चॅरिटी या त्रिसूत्रीला कधीही कात्री लावली नाही. ग्राहकांना चांगलं द्यायचं असेल, लोकांच्या भल्याचं काही करायचं असेल, तर याला पर्याय नाही. त्यामुळे करोडो रुपये आम्ही संशोधनावर खर्च करतो. त्यात काही वेळा यश येतं, काही वेळा अपयश. ते गृहित धरून प्रयत्न करत राहाणं आपल्या हाती असतं. त्यामुळे आम्ही आमच्या पातळीवर सातत्याने प्रयत्न करत राहतो. त्याची दखल सरकारने घेतली नाही तरी लोक ती घेतात, यात आम्हाला अधिक समाधान आहे. मेक इन इंडिया यापेक्षा वेगळं काही नाही; पण तेवढंच करून चालणार नाही. ते 'फॉर इंडिया'कसं होईल, हेही पाहिलं पाहिजे. माझा फोकस भारत, भारतातली सर्वसामान्य कष्टकरी जनता, शेतकरी यांचं भलं कसं होईल, त्यांच्या जीवनात आनंद कसा आणता येईल, ते सुखी कसं होईल हा राहिलेला आहे. त्यातूनच आजवरची वाटचाल झाली आहे'', असं भवरलालजी जैन सांगतात.

हे खरंच आहे, की जैन उद्योग समूहाने गेल्या तीस-चाळीस वर्षांत 'मेक इन इंडिया, फॉर इंडिया'या तत्त्वाला धरून देशाच्या विकासाला गती देणाऱ्या अनेक महत्त्वपूर्ण गोष्टी केल्या आहेत. जैन इरिगेशनने १९७० च्या दशकात पपेन पावडरच्या अतिशुद्ध निर्मितीद्वारे जागतिक स्तरावर प्रथम क्रमांकाची मुहूर्तमेढ रोवली. १९८०च्या दशकात ठिबक सिंचन व पीव्हीसी पाईप यात जागतिक दर्जाचं काम करत पाणी बचतीबरोबरच शेती उत्पादन वाढवण्याचा चमत्कार घडवून आणला. १९९०च्या दशकात फळप्रक्रिया प्रकल्प निर्मितीद्वारे आंबा व केळी प्रक्रिया उद्योगातून शेती व्यवसायाला नवी वाट दाखवली. आंबा प्रक्रियेसाठी जैन इरिगेशनचे नाव पहिल्या क्रमांकावर आहे. कांदा प्रक्रियेसाठी लागणारे अतिउच्च तंत्रज्ञान याच कंपनीच्या नावावर आहे. २००० मध्ये केळी रोपांच्या टिश्युकल्चर निर्मितीमध्ये जगात प्रथम क्रमांक मिळवून आपला वेगळा ठसा उमटविला. यापाठोपाठ सौरऊर्जेवर आधारित नावीन्यपूर्ण अशा वॉटर फिल्टरची निर्मिती करून शुद्ध पाणी सामान्यांच्या आवाक्यात आणलं.

## शासनाचा पाठिंबा वाढावा

हे सारे प्रयत्न 'मेक इन इंडिया'ला फॉर इंडियापर्यंत घेऊन जाणारे आहेत. अर्थात, अशा खासगी संस्थांच्या प्रयत्नांना शासनाचाही हातभार लागणं फार महत्त्वाचं आहे. तो अनुदानाच्या पातळीवर काही प्रमाणात लागतो; परंतु त्या पलीकडे जाऊन काही प्रयत्न शासकीय पातळीवरून होणं गरजेचं आहे. त्या अनुषंगाने बोलताना भवरलालजी जैन सांगतात, ''शासन आणि समाज या दोन्ही पातळीवर आपली मानसिकता फार विचित्र आहे. शासन म्हणजे देशाचं भलं करणारी संस्था, असं आपण मानतो. ते चुकीचं नाही; परंतु त्यामुळे इतर खासगी क्षेत्रातल्या संस्था जे काम करतात तेसुद्धा देशहिताचं असू शकतं, हे आपण स्वीकारणार की नाही? माणूस चोरी करूनच मोठा होऊ शकतो, असाही आपला समज आहे. त्यातून गरिबीचं उदात्तीकरण आपल्याकडे होतं. यात श्रीमंतीकडे आपण देशद्रोह असल्यासारखे पाहतो. त्यामुळे खासगी पातळीवर अनेक चांगले प्रयत्न होत असूनही ते उचलले जात नाहीत. किंबहुना त्या प्रयत्नांना दाबून कसं टाकता येईल, असाच प्रयत्न होतो. हे कुठेतरी थांबलं पाहिजे. चांगल्या संशोधनाला सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवलं पाहिजे. आम्ही ते काम आमच्या पातळीवर शक्य होईल तसं करत असतो. त्याला शासनाचा हातभार लागला तर ते अधिक लोकांपर्यंत जाईल.''

भवरलालजी जैन यांच्या म्हणण्यानुसार, अमेरिकेचा अध्यक्ष भारतात येतो तेव्हा अमुक एक कॉन्ट्रॅक्ट आमच्या देशातील तमुक एका कंपनीला द्या, असं सांगतो. हाच देश खासगी संस्थांना देशहिताच्या संशोधनासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देतो. आपल्याकडे मात्र हे घडताना दिसत नाही. आपल्या पंतप्रधानांनी असं काही म्हटलंच तर तो त्या कंपनीला विकला गेलेला आहे, अशी टीका सुरू होते. खासगी आणि शासकीय, असा दुजाभाव आपल्याकडे विनाकारण निर्माण केला गेला आहे. त्याचा परिणाम चांगल्या गोष्टी लोकांपर्यंत न पोहोचण्यात होतो आहे, जे देशहितासाठीही योग्य नाही.

खरं म्हणजे शासनाने अशा लोकोपयोगी संशोधनाच्या मागे पूर्ण ताकदीनिशी उभं राहिलं पाहिजे. तरच ते खऱ्या अर्थाने लोकांपर्यंत पोहोचू शकतं. जैन उद्योग समूहाने केळी रोपांचं टिश्युकल्चर निर्माण केलं. त्यासाठी सुमारे ८० ते १०० कोटी रुपये संशोधनावर खर्च






> *''आमच्यासारखे अनेक लोक मूलभूत संशोधनावर भर देण्याचा वेडेपणा करतात. देशाच्या आजवर झालेल्या प्रगतीने जो पल्ला गाठला आहे त्यात कदाचित अशा वेडेपणाचा भाग असेल. यातूनच लोकांना काही मूलभूत गोष्टी मिळाल्या आहेत. शाश्वत स्वरूपाचं काही काम त्यातून होऊ शकलेलं आहे. आजही सर्वांना त्याची खरी गरज आहे म्हणून ते जबाबदारीनं केलं पाहिजे.''*
>
> ***–भवरलाल जैन***

**जैन एरिगेशन व अमेरिकेतील एमआयटीच्या संयुक्त विद्यमाने विकसीत करण्यात आलेल्या वॉटर फिल्टरच्या युनिटसह संशोधक जॉर्जिया झँडे, अभिषेक निरखे, नताशा राईट व प्रोफेसर डॉ. ॲमोस विंटर.**

केले. अत्याधुनिक लॅब उभारल्या. तेव्हा टिश्युकल्चर निर्माण झालं. ते शेती आणि शेतकऱ्यांना नवी ऊर्जा देणारं ठरलं. अर्थात, एवढा मोठा खर्च करून शोधलेलं हे टिश्युकल्चर सामान्यांना परवडेल अशा किमतीत द्यायचं कसं, हा प्रश्न आजही आहेच. अशावेळी शासनाने थेट शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला, तर हे शेतीउपयोगी तंत्र सर्वसामान्यांपर्यंत मोठ्या प्रमाणात पोहोचू शकतं. त्यातून मूळ संशोधकाचा भार हलका होऊ शकतो; पण शासन असा विचार करताना दिसत नाही. त्याऐवजी टिश्युकल्चरच्या नव्या प्रयोगशाळा उभारण्यासाठी कृषी विद्यापीठांना काही कोटी देण्याचा निर्णय घेते. ही मदत तशी पुरेशी ठरत नाही. परिणामी प्रयोगशाळा उभ्या राहू शकत नाहीत. राहिल्याच तरी त्या कार्यान्वित होऊ शकत नाहीत. त्यामुळे जनतेचा पैसा वाया जातो. हे कुठंतरी टाळायला हवं. त्यासाठी चांगलं काम करणाऱ्या खासगी कंपन्यांच्या मागे शासनाने खंबीरपणे उभं राहायला हवं, हीच तळमळ भवरलालजी जैन यांच्या बोलण्यातून व्यक्त होते.

अशा अनेक गोष्टी घडत असतानाही जैन उद्योग समूह मात्र आपल्या पायावर भक्कम उभा आहे. तो कसा? भवरलालजी जैन सांगतात, 'आपल्याकडे क्षेत्र कोणतंही घ्या, अनंत अडचणी रोज येत असतात. त्या अडचणींना संधी मानून काम केलं तर अनेक गोष्टी साध्य होऊ शकतात. माझा फोकस हा नेहमीच ग्रामीण जीवन आणि शेतकरी हा राहिलेला आहे. आपण जे काही करू, ते या वर्गाच्या भल्यासाठी, असं आमचं धोरण आहे. कारण त्यातूनच देशाचा विकास होणार आहे. हा वर्ग सुधारायचा तर त्याची शेती सुधारली पाहिजे, तरच त्याचं जीवनमान उंचावणार आहे. तरच तो आपल्या मुलांना चांगल्या शाळांमध्ये घालू शकणार आहे. ते कसं साध्य होईल यादृष्टीने आम्ही काम करत राहतो. त्यातून पपेन पावडर तयार केली. टिश्युकल्चरची निर्मिती केली. इरिगेशनमध्ये ठिबक सिंचनाचं तंत्र आणलं. विजेचा प्रश्न शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात सतावत राहतो. त्यावर उपाय म्हणून शेतीमध्ये सौरऊर्जेचा वापर कसा करता येईल, तो कसा वाढवता येईल यादृष्टीने काही प्रयत्न केले. त्याला यश मिळालं. त्यातून आम्ही सोलर पंप विकसित केले. कमीत कमी खर्चात यातून लोकांच्या अनेक गरजा सहज पूर्ण होऊ लागल्या. त्यामुळे सर्वसामान्यांचा उदंड प्रतिसाद आमच्या संशोधनाला मिळत गेला. तोच आमचा आधार बनला.''

हाच आधार अधिक भक्कम करत जैन उद्योग समूह 'सोलर वॉटर फिल्टर'च्या तंत्र निर्मितीपर्यंत पोहोचला आहे. मेक इन इंडियाकडून फॉर इंडियाकडे जाणारा हा उद्योग समूह म्हणूनच महत्त्वाचा ठरतो. अर्थात मेक इन इंडियाची चर्चा करत असताना जैन उद्योग समूहाचा हाच कित्ता इतर उद्योग समूहांसह शासनानेही गिरवण्याची खरी गरज आहे. तसं घडलं तर भारताला जागतिक स्तरावर अव्वल स्थान मिळवण्यापासून कोणी रोखू शकणार नाही. हे शक्य आहे हे जैन उद्योग समूहाने आपल्या कृतीतून दाखवून दिलं आहे...